ePaper
होर्मुझच्या आखातात तेलाच्या टँकरवर प्रोजेक्टाईलद्वारे हल्ला; 5 भारतीयांची सुखरूप सुटका

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | रविवार, दि. 04 ऑक्टोबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!






पान 2 वरुन...

'एफडीए'ची 'सिप्ला' फार्मावर कारवाई!

## ज्ञानेश कुमारांविरोधात राजकारण तापलं! नेहा बोरा, योगेंद्र यादव ताब्यात

# जंतर-मंतरवर पुन्हा राडा!







महाईन्यूज ।
नवी दिल्ली

**मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी आंदोलन छेडलं आहे. या आंदोलनाला ऑल इंडिया स्टुडंट असोसिएशननेही पाठिंबा दिला असून AISAच्या अध्यक्षा नेहा बोरा यांनीही आंदोलनात सहभाग घेतला. मात्र, आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशी त्यांना दिल्ली पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. त्यांच्यासह स्वराज इंडियाचे सदस्य योगेंद्र यादव यांनाही ताब्यात घेतलं आहे.**

२ ऑक्टोबरपासून दिल्लीतील जंतर मंतर येथे आंदोलन करण्यात येत आहे. या आंदोलनाला पोलिसांनी परवानगी दिलेली नाही. त्यामुळे पोलिसांनी आंदोलनाच्या पहिल्या दिवशीही ५५० आंदोलकांना पोलिसांनी ताब्यात घेतलं. यामध्ये नेहा बोरा आणि योगेंद्र यादव यांचाही समावेश होता. तर, आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशी म्हणजेच शनिवारी, आंदोलनकर्ते मुख्य निवडणूक आयुक्तांच्या विरोधात आंदोलनासाठी जमा झाले होते आणि त्यांनी जंतरमंतरच्या दिशेने मोर्चा काढण्यास सुरुवात केली होती.

बोरा, यादव आणि विद्यार्थी कार्यकर्त्यांसोबतच या आंदोलनात राज्यसभा खासदार कपिल सिबल आणि ज्येष्ठ वकील प्रशांत भूषण हे देखील सहभागी झाले होते. आंदोलनकर्त्यांनी बॅरिकेड्सचा पहिला टप्पा पार केला, परंतु पोलिसांनी त्यांना जंतरमंतर रोडजवळ अडवलं आणि बसमध्ये बसवून ताब्यात घेतलं. ताब्यात घेतलं जात असताना नेहा बोरा आणि इतर आंदोलक घोषणाबाजी करताना दिसले.

दरम्यान, शुक्रवारी जंतर मंतर येथे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात निदर्शन करण्याच्या प्रयत्नांप्रकरणी दिल्ली पोलिसांनी अज्ञात व्यक्तींविरुद्ध तीन एफआयआर दाखल केले आहेत. दोन एफआयआर पार्लमेंट स्ट्रीट पोलीस ठाण्यात आणि एक कनॉट प्लेस पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे.

## दिल्लीत जमावबंदी लागू

जंतरमंतरवर मुख्य निवडणूक आयुक्तांच्या विरोधात आंदोलन करण्याचे दोन दिवसांपासून प्रयत्न होत असतानाच, मध्य दिल्लीत सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे. नवी दिल्ली जिल्ह्यात जमावबंदीचे आदेश लागू करण्यात आले असून, सुमारे ५ हजार पोलीस आणि निमलष्करी दलाचे जवान तैनात करण्यात आले आहेत, तसंच ठिकठिकाणी बहुस्तरीय बॅरिकेड्स उभारण्यात आले आहेत. शुक्रवारच्या आंदोलनाप्रकरणी पोलिसांनी अज्ञात व्यक्तींविरोधात तीन एफआयआर (FIR) नोंदवले आहेत. सरकारी आदेशाचे उल्लंघन करणे, सरकारी कामात अडथळा आणणे, सरकारी कर्मचाऱ्यावर गुन्हेगारी बळाचा वापर करणे आणि समान हेतूने एकत्रित येऊन कृत्य करणे या आरोपांखाली हे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# 'एफडीए'ची 'सिप्ला' फार्मावर कारवाई!

## न्यायालयीन निर्देशांनुसार नव्याने प्रक्रिया; वडकीतील औषध विक्रीचे परवाने रद्द

**महाईन्यूज । पुणे**

**न्यायालयीन निर्देशांनुसार नव्याने प्रक्रिया करून वडकीतील 'सिप्ला फार्मा अँड लाइफ सायन्सेस'चे औषध विक्री परवाने रद्द करण्याचा आदेश अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) गुरुवारी दिला. 'एफडीए'ने शुक्रवारी प्रसिद्धी पत्रकाद्वारे ही माहिती दिली.वडकीतील सिप्ला फार्मावर ऑगस्टमध्ये केलेल्या कारवाईबाबत उच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करून पूर्वीची कार्यवाही मागे घेण्यात आली होती. नंतर चार सप्टेंबरला सुधारित 'कारणे दाखवा' नोटीस बजावण्यात आली. संस्थेने ११ सप्टेंबरला लेखी उत्तर सादर केले. वैयक्तिक सुनावणीची संधी २१ सप्टेंबरला देण्यात आली.**




'संस्थेचे लेखी उत्तर, सुनावणीतील म्हणणे, तपासणीतील निष्कर्ष, उपलब्ध अभिलेख आणि लागू असलेल्या कायदेशीर तरतुदींचा एकत्रित विचार करून संस्थेचे वडकी, पुणे येथील सीएफए घाऊक औषध विक्री परवाने रद्दचा आदेश सहायक आयुक्त (औषधे), परिमंडळ ३ तथा परवाना प्राधिकारी, अन्न व औषध प्रशासन, पुणे यांनी एक ऑक्टोबरला काढला. त्यामुळे हा निर्णय केवळ पूर्वीच्या कारवाईची पुनरावृत्ती नसून, न्यायालयीन निर्देशांनुसार नव्याने संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करून घेतलेला स्वतंत्र नियामक निर्णय आहे,' अशी माहिती 'एफडीए'ने दिली.

पत्रकात म्हटले आहे, 'वडकी येथील गोदामाच्या तपासणीदरम्यान – रिएक्टिन प्लस (शेड्युल एच) औषधाचा साठा आढळून आला. त्याच्या वेष्टणावर मानवी आकृती दाखवून औषधाचा वापराने मानवी स्नायूंमधील दुखणे कमी होते, असे दर्शवण्यात आले होते. हे दावे, मजकूर व चित्रण याबाबत लागू असलेल्या वैधानिक तरतुदींचे अनुपालन न झाल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार, आवश्यक नियामक कार्यवाही करण्यात आली.'

औषधे सौंदर्य प्रसाधने नियमानुसार औषध बाजारात आणणाऱ्या मार्केटिअरची जबाबदारी विचारात घेण्यात आली. केवळ उत्पादकाची जबाबदारी दाखवून मार्केटिअर म्हणून असलेल्या वैधानिक जबाबदारीपासून संबंधित आस्थापना मुक्त होऊ शकत नाही,' असा निष्कर्ष परवाना प्राधिकरणाने नोंदविला.

अन्न व औषध प्रशासनाचे उद्दिष्ट केवळ कारवाई करणे नसून, औषधांची सुरक्षितता, गुणवत्ता आणि औषध पुरवठा साखळीतील वैधानिक अनुपालन सुनिश्चित करणे हे आहे. या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशांचा पूर्ण आदर राखून नैसर्गिक न्यायतत्त्वे, पारदर्शकता, सुनावणीची संधी आणि कारणयुक्त निर्णय या सर्व बाबींचे पालन करून कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे. यापुढेही प्रशासन नियमानुसार आवश्यक कार्यवाही करित राहील.अशी माहिती एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिली.

### 'निर्णय निराशाजनक'

'पुण्यातील वडकी येथील आमच्या 'सी अँड एफए' गोदामाबाबत महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाने घेतलेला निर्णय निराशाजनक आहे. पुण्यातील आमचे 'सी अँड एफए' गोदाम औषधांच्या वितरण आणि साठवणुकीसंबंधीच्या नियमांचे, तसेच डिजिटल नोंदींच्या बाबतीत मानकांचे पालन करणारे आहे. आम्ही या आदेशाचा आढावा घेत असून, पुढील पर्यायांचा विचार करीत आहोत. रुग्ण आणि आरोग्यसेवा पुरवठादारांना सुरक्षित आणि उच्च दर्जाची औषधे अखंडितपणे उपलब्ध करून देण्यासाठी 'सिप्ला' पूर्णपणे कटिबद्ध आहे,' असे 'सिप्ला'ने स्पष्ट केले.

# कोथरूडमधील ४६७ झाडे तोडण्याच्या निर्णयाला महापालिकेची तात्पुरती स्थगिती

**महाईन्यूज । पुणे**

**'कोथरूड येथील 'अॅव्हेन्यू सिटीप्राईड'जवळील ४६७ झाडे तोडण्याच्या निर्णयाला महापालिकेने स्थगिती दिली आहे. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी हा निर्णय घेतला. झाडे तोडण्याला नागरिकांनी तीव्र विरोध केला होता. झाडे तोडण्यास स्थगितीचा निर्णय देताना तोडलेल्या झाडांच्या पुनर्रोपणासाठी महापालिकेकडे जागा उपलब्ध नसल्याचे कारण देण्यात आले आहे.**



कोथरूड येथील सर्व्हे नंबर १२/२, १२ /५ मधील रस्त्याचे रुंदीकरण केले जाणार आहे. पुणे महापालिकेच्या विकास आराखड्यामध्ये (डीपी) हा रस्ता २० मीटर रुंदीचा दाखविण्यात आला आहे. हा रस्ता रुंद करण्यासाठी या भागातील सुमारे ४६७ झाडांचा अडथळा ठरत आहेत. त्यामुळे महापालिका प्रशासनाने याचे सर्वेक्षण केले.

यातील १४९ झाडे पूर्णपणे काढून उर्वरित ३१८ झाडांचे पुनर्रोपण करण्याचा ठराव महापालिकेच्या पथ विभागाने वृक्ष प्राधिकरण समितीकडून तीन वर्षांपूर्वी मान्य करून घेतला. सप्टेंबर २०२३ मध्ये ही झाडे तोडण्यासाठी मान्यता देण्यात आली. मात्र, त्यानंतर महापालिकेने यावर कोणतीही कार्यवाही केली नाही.

गेल्या महिन्यात या भागातील ५० पेक्षा अधिक झाडे महापालिकेने रस्ता रुंदीकरणासाठी तोडली. एवढ्या मोठ्या प्रमाणात या भागातील झाडांची कत्तल होणार असल्याचे लक्षात आल्यानंतर स्थानिक नागरिकांनी याला विरोध केला. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे राज्याचे सरचिटणीस हेमंत संभूस यांनी विरोध करून आंदोलनाचा इशारा दिला.

संभूस म्हणाले, 'या भागात महापालिकेने २० मीटर रुंदीचा रस्ता करण्याचा घाट घातला आहे. या रस्त्यासाठी झाडे तोडली जाणार असल्याने येथील हरित भाग संपुष्टात येणार आहे. या रस्त्याचा कोथरूडकरांना कोणताही उपयोग नाही. ठराविक व्यक्तींना फायदा व्हावा, यासाठी हे उद्योग सुरू आहेत.'

महापालिकेच्या विकास आराखड्यात मृत्युंजयेश्वर मंदिराजवळील ओढ्यापासून सौरभ हॉलपर्यंत ३० मीटर रुंदीचा रस्ता प्रस्तावित आहे. सुमारे तीन वर्षांपूर्वी संबंधित जागामालकाने 'एफएसआय'च्या मोबदल्यात २० मीटर रुंदीच्या रस्त्यासाठी ही जागा महापालिकेकडे हस्तांतरित केली.

रस्त्याच्या रुंदीकरणाला अडथळा ठरणारी ४६७ झाडे तोडली जाणार आहेत. त्याच्या बदल्यात सुमारे ६५०० झाडे लावली जाणार असल्याचा दावा महापालिकेच्या पथ विभागाकडून केला जात आहे. ही झाडे तोडल्याने कोथरूडमधील हिरवागार परिसर कायमचा नाहीसा होणार असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

ही ४६७ झाडांच्या पुनर्रोपणासाठी महापालिका प्रशासनाकडे जागा उपलब्ध नाही. जागा नसतानाही महापालिकेने झाडे तोडण्यास सुरुवात केल्याने नागरिकांनी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्याकडे तक्रार केली. त्यानंतर झाडे तोडण्यास स्थगिती देण्यात आली. महापालिकेच्या पथ विभागाचे मुख्य अभियंता राजेश बनकर म्हणाले, 'या भागातील झाडे तोडून त्याच्या बदल्यात सुमारे ६५०० झाडे महापालिकेकडून लावली जाणार आहेत. यासाठी लुल्लानगर येथे वन विभागाची जागा मिळणार आहे. महापालिकेकडे सध्या जागा उपलब्ध नसल्याने कोथरूड येथे रस्ता रुंद करण्यासाठी सुरू केलेली वृक्षतोड स्थगित केली आहे.'

# ऑनलाईन सेवाकर भरण्यास झोपडपट्टीवासीयांचा मोठा प्रतिसाद

## ऑनलाइन करभरणीला नागरिकांची पसंती; सेवा कर संकलन प्रक्रियेला मिळाला वेग

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभागामार्फत आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये झोपडपट्टी सेवा कर संकलनासाठी ऑनलाइन सुविधेचा प्रभावी वापर करण्यात येत असून, झोपडपट्टीवासीयांचा या सुविधेला चांगला प्रतिसाद मिळत आहे. चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहामाहीत ऑनलाइन माध्यमातून ४२२ पावत्यांद्वारे १२ लाख ४९ हजार ७६२ रुपयांचा सेवा कर जमा झाला आहे.**



तर १ एप्रिल २०२६ ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत ऑनलाइन आणि ऑफलाइन अशा दोन्ही माध्यमांतून एकूण ८३१ पावत्यांद्वारे २६ लाख १५ हजार २७१ रुपयांचा झोपडपट्टी सेवा कर महापालिकेकडे जमा झाला आहे.

पिंपरी चिंचवड महापालिकेने यंदा सेवा कर भरण्यासाठी ऑनलाइन व ऑफलाइन अशा दोन्ही सुविधा उपलब्ध करून दिल्या होत्या. यामध्ये ऑनलाइन सुविधेला चांगला प्रतिसाद मिळाला. ऑनलाइन सुविधेमुळे कर भरण्याची प्रक्रिया अधिक सुलभ आणि वेळेची बचत करणारी ठरली. ऑनलाइन पद्धतीने कर भरणाऱ्यांची संख्या वाढत असून, नागरिकांना डिजिटल माध्यमातून सेवा कर भरण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येत आहे.

झोपडपट्टी सेवा कर संकलन अधिक प्रभावी करण्यासाठी ऑनलाइन सुविधांचा विस्तार, नागरिकांमध्ये जनजागृती, कर भरण्यासाठी उपलब्ध सुविधांची माहिती पोहोचविणे तसेच थकबाकी वसुलीचा नियमित आढावा घेण्यावर झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभागाकडून विशेष भर देण्यात आला. त्यामुळे यंदा आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहामाहीत विक्रमी वसुली झाली आहे. यापूर्वी आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये २५ लाख ३७ हजार २४८ रुपये, २०२३-२४ मध्ये २५ लाख २७ हजार ३८८ रुपये, २०२४-२५ मध्ये १० लाख १४ हजार ९६७ रुपये वसुली झाली होती. तर यावर्षी म्हणजेच २०२६-२७ च्या पहिल्या सहामाहीत २६ लाख १५ हजार २७१ रुपयांचा सेवा कर जमा झाला आहे.

महिला बचत गटातील महिलांमार्फत झोपडपट्टी सेवा कराची बिले वाटप करण्यात येत आहेत. यामुळे नागरिकांमध्ये सेवा कर भरण्याबाबत जनजागृती होत असून, झोपडपट्टीतील महिलांना रोजगाराची संधीही उपलब्ध होत आहे. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम यशस्वी ठरत आहे.

> झोपडपट्टी सेवा कराची वसुली अधिक प्रभावी करण्यासाठी ऑनलाइन सुविधांचा विस्तार, करदात्यांमध्ये जनजागृती आणि थकबाकी वसुलीचा सातत्याने आढावा घेण्यात येत आहे. पहिल्या सहामाहीत झालेली २६ लाख १५ हजार रुपयांची वसुली ही या प्रयत्नांना मिळालेला सकारात्मक प्रतिसाद आहे. करदात्यांना सुलभ पद्धतीने सेवा कर भरण्याची सुविधा उपलब्ध करून देत वसुली प्रक्रिया अधिक गतिमान करण्यावर महापालिकेचा भर राहणार आहे.
>
> **- डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त.**

> झोपडपट्टी सेवा कर भरण्याची प्रक्रिया नागरिकांसाठी अधिक सुलभ आणि पारदर्शक करण्यासाठी महापालिकेकडून विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. ऑनलाइन पद्धतीने कर भरण्याची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे नागरिकांना घरबसल्या सेवा कर भरणे शक्य झाले आहे. या सुविधेचा अधिकाधिक नागरिकांनी लाभ घ्यावा, यासाठी आवश्यक जनजागृती आणि मार्गदर्शन करण्यात येत आहे.
>
> **- तृप्ती सांडभोर, अतिरिक्त आयुक्त.**

> झोपडपट्टी सेवा कर संकलनासाठी ऑनलाइन आणि ऑफलाइन अशा दोन्ही माध्यमांचा प्रभावी वापर करण्यात येत आहे. चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहामाहीत ८३१ पावत्यांद्वारे २६ लाख १५ हजार २७१ रुपयांचा सेवा कर जमा झाला आहे. करदात्यांपर्यंत आवश्यक माहिती पोहोचविणे, कर भरण्यासाठी उपलब्ध सुविधांची माहिती देणे आणि थकबाकीचा नियमित आढावा घेणे यामुळे वसुली प्रक्रियेला अधिक गती मिळत आहे. आगामी काळातही सेवा कर संकलन वाढविण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने कार्यवाही करण्यात येईल.
>
> **- अण्णा बोदडे, उपायुक्त.**

# मराठी लोकसंस्कृतीचा सुरेल 'अंतर्नाद- अ जर्नी टू द सोल' ने रसिकांना केले अंतर्मुख!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**संतवाणीतील भक्तिभावापासून ते पोवाड्याच्या जोशापर्यंत... लावणीच्या ठेक्यापासून ते भारूडाच्या सामाजिक आशयापर्यंत... आणि ओव्यांच्या भावविश्वापासून पंढरीच्या विठ्ठलापर्यंतचा सुरेल प्रवास 'अंतर्नाद – अ जर्नी टू द सोल' या नाट्य-संगीतमय आविष्कारातून रसिक प्रेक्षकांना अंतर्मुख करून गेला.**



### कार्यक्रमांना 'हाऊसफुल्ल' प्रतिसाद!

अभिजात मराठी भाषा सप्ताहाच्या पहिल्याच दिवशी आयोजित कार्यक्रमाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहातील सर्व आसने भरून गेल्याने कार्यक्रमाला 'हाऊसफुल्ल' प्रतिसाद लाभला. मराठी भाषा, साहित्य, लोककला आणि संस्कृतीशी जोडलेल्या सप्ताहातील विविध कार्यक्रमांचा रसिकांनी आनंद घेतला. टाळ्यांच्या कडकडाटाने कलाकारांचा उत्साह वाढवला.

अभिजात मराठी भाषेचा जागर घडविण्यासह मराठी भाषेचे संवर्धन, प्रचार आणि प्रसार करण्याच्या उद्देशाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली, तर विशेष अधिकारी तथा मराठी भाषा समन्वय अधिकारी किरण गायकवाड यांच्या अधिपत्याखाली ३ ऑक्टोबर हा 'अभिजात मराठी भाषा सन्मान दिन' तसेच ३ ते ९ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत 'अभिजात मराठी भाषा सप्ताह' विविध उपक्रमांनी साजरा करण्यात येत आहे.

या सप्ताहाच्या पहिल्याच दिवशी चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे मोरया थिएटर्सच्या वतीने 'अंतर्नाद – अ जर्नी टू द सोल' हा नाट्य-संगीतमय आविष्कार सादर करण्यात आला. मराठी संतपरंपरा, लोकसंगीत, भक्तिरस आणि महाराष्ट्राच्या लोकजीवनातील विविध रंगांची सुरेल गुंफण या कार्यक्रमातून रसिकांना अनुभवायला मिळाली.

कार्यक्रमाची सुरुवात 'विठ्ठल माझा मला पावलं का...' या गीताने झाली. त्यानंतर 'पालखी सोहळा', गवळण, 'पोवाडा', 'दिंडीचे वर्णन सांगणारे गीत', 'गोंधळ' अशा विविध सादरीकरणांनी कार्यक्रमाला रंगत आणली. पुढे रॅप, लावणी, पिंगळा, रिंगण, भारूड अशा विविध कलाप्रकारांच्या सादरीकरणातून मराठीच्या विविध बोली, लोकपरंपरा आणि समृद्ध संगीतविश्वाचे दर्शन घडले.

संतपरंपरेतील भक्तिरस, लोककलेतील उत्स्फूर्तता आणि मराठी मातीतील सांस्कृतिक वैविध्य यांचा सुरेल संगम या आविष्कारातून साधण्यात आला. शब्दांना सूर, सुरांना भाव आणि भावनांना लोकसंस्कृतीची समृद्ध किनार लाभल्याने 'अंतर्नाद' हा अभिजात मराठी भाषेच्या सांस्कृतिक वैभवाचा अनुभव देणारा ठरला.

या निमित्ताने मराठी संस्कृतीतील विविध लोककला आणि संगीतप्रकारांची बहारदार अनुभूती प्रेक्षकांना मिळाली. उपस्थित रसिकांनी या नाट्य-संगीतमय कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत अभिजात मराठी भाषेच्या जागरात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

सनई, हलगी, संबळ आदी पारंपरिक वाद्यांच्या निनादात 'अभिजात मराठी भाषा सप्ताहा'चा उत्साहपूर्ण शुभारंभ करण्यात आला. पारंपरिक वाद्यांच्या सुरांनी सकाळपासूनच परिसरात मराठी संस्कृतीचा जागर अनुभवायला मिळाला. ताशाकिंग सिराजभाई यांच्या ताशा वादनाने वातावरणात उत्साह निर्माण झाला. त्यानंतर पारंपरिक गीतांवर संबळ वादन करण्यात आले. तसेच हलगी वादनातून महाराष्ट्राच्या लोकपरंपरेतील जोश आणि उत्स्फूर्ततेचे दर्शन घडले. पारंपरिक वाद्यांच्या ताल-सुरांनी अभिजात मराठी भाषा सप्ताहाच्या शुभारंभाला लोककलेचा अनोखा रंग लाभला.

यावेळी बँड पथकाने 'जय जय महाराष्ट्र माझा' या महाराष्ट्राच्या अस्मितेचा जागर करणाऱ्या गीताचे उत्साहपूर्ण सादरीकरण केले. ताशा, संबळ, हलगी आणि बँडच्या तालावर परिसरातील वातावरण भारावून गेले. मराठी भाषेचा अभिमान आणि महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचा उत्सव साजरा करणाऱ्या या उपक्रमात तरुणाईने उत्स्फूर्तपणे सहभाग घेत ताल धरत जल्लोष केला. पारंपरिक लोकवाद्यांच्या निनादाने आणि 'जय जय महाराष्ट्र माझा'च्या सुरांनी उपस्थितांमध्ये उत्साह संचारला. कलाकारांच्या सादरीकरणाला उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद देत अभिजात मराठी भाषा सप्ताहाच्या शुभारंभाचा आनंद द्विगुणित केला.



## भूमिका

**महाराष्ट्रातील यंदाची दुष्काळी परिस्थिती ही केवळ सरकारी आकडेवारीचा विषय राहिलेली नाही. राज्यातील ३५८ पैकी २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर झाला असून, २०२६च्या पावसाळ्यात राज्यात सुमारे १८ टक्के पावसाची तूट नोंदली गेली आहे. मराठवाडा आणि विदर्भातील तूट त्याहून अधिक असल्याचे उपलब्ध अहवाल सांगतात.**

# महाराष्ट्रासमोर दुष्काळाचे दुहेरी संकट!



अशा परिस्थितीत प्रश्न दुष्काळ जाहीर झाला की नाही, एवढाच नसून त्याचा परिणाम शेतकरी, शेतमजूर आणि पशुधनावर किती झाला आणि मदत किती वेगाने पोहोचते, हा आहे.

दुष्काळ व्यवस्थापनाच्या प्रक्रियेत ‘ट्रिगर-१’ ही सुरुवातीची पायरी आहे. त्यानंतर पिकांची स्थिती, पेरणीचे क्षेत्र, जमिनीतील ओलावा, रिमोट सेन्सिंग आणि इतर परिणाम निर्देशकांच्या आधारे ‘ट्रिगर-२’मध्ये दुष्काळाची तीव्रता तपासली जाते. त्यामुळे ट्रिगर-१ लागू झालेल्या प्रत्येक तालुक्यात नुकसानीचे प्रमाण सारखेच असेल, असे मानता येत नाही.

याच ठिकाणी दुष्काळाच्या तालुकानिहाय यादीचा प्रश्न महत्त्वाचा ठरतो. काही भागांचा समावेश झाला, तर काही भाग वगळले गेले. सरकारने काही तालुक्यांबाबत फेरतपासणीचे संकेतही दिले आहेत. त्यामुळे मदतीचे निकष पारदर्शक असणे आणि प्रत्यक्ष परिस्थितीची खातरजमा होणे आवश्यक ठरते.

सरकारने दुष्काळग्रस्त तालुक्यांसाठी कर्ज पुनर्गठन, जमीन महसूल सवलत, कृषिपंपांच्या वीजबिलात सवलत, पाणीपुरवठ्याचे नियोजन आणि इतर उपाययोजना जाहीर केल्या आहेत. मात्र पीक नुकसानीची थेट आर्थिक मदत पंचनाम्यांनंतर निश्चित केली जाणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हातात प्रत्यक्ष मदत कधी पोहोचते, हा या संपूर्ण प्रक्रियेतील महत्त्वाचा टप्पा आहे.

पंचनामे ही केवळ कागदोपत्री प्रक्रिया राहू नये. डिजिटल पद्धतीने कागदपत्रे गोळा करणे सोयीचे असले, तरी प्रत्यक्ष शेतातील नुकसान, जमिनीची अवस्था आणि पिकांची स्थिती यांची पडताळणी तितकीच महत्त्वाची आहे. कारण दुष्काळाची तीव्रता कागदावरच्या आकड्यांपेक्षा शेताच्या बांधावर अधिक स्पष्ट दिसते.

दुष्काळात पिण्याच्या पाण्याबरोबरच जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही गंभीर असतो. भूजलपातळी आणि पर्जन्यमानातील तूट लक्षात घेता काही भागांत पाणीटंचाईचा कालावधी लांबण्याची शक्यता प्रशासनाच्या आकडेवारीतही अधोरेखित होते. त्यामुळे चारा, पाणी आणि पशुधनाचे संरक्षण हे दुष्काळ व्यवस्थापनाचे स्वतंत्र घटक म्हणून पाहावे लागेल.

शरद पवार यांनी विशेष अधिवेशन, आर्थिक मदत, कर्जमाफी, वीजबिल सवलत, चारा आणि पाणी यांसह विविध मागण्या केल्या आहेत. या मागण्यांवर राजकीय मतभेद असू शकतात; मात्र दुष्काळग्रस्तांच्या गरजा आणि उपलब्ध शासकीय यंत्रणेची क्षमता यांचा वस्तुनिष्ठ आढावा घेणे आवश्यक आहे.

दुष्काळ जाहीर करणे ही सुरुवात आहे; अंतिम उद्दिष्ट नाही. तालुक्यांची यादी, पंचनामे आणि शासन निर्णय यापलीकडे मदत प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचली का, पाणी उपलब्ध झाले का, जनावरांसाठी चारा मिळाला का आणि रब्बी हंगामासाठी पुरेशी तयारी झाली का.. यावरच दुष्काळ व्यवस्थापनाचे खरे मूल्यमापन होईल. सरकारी कागदावरील दुष्काळ आणि गावातील दुष्काळ यांच्यातील अंतर कमी करणे, हीच सध्याच्या संकटातील सर्वात मोठी प्रशासनिक कसोटी आहे.

## प्रासंगिक »

### संगतीचे परिणाम

**एक शेतकरी होता. त्या शेतकऱ्याच्या शेतात कावळ्यांचा एक मोठा थवा रोज यायचा. ते कावळे शेतातील पिकांची नासाडी करायचे. त्यामुळे शेतकऱ्याला खूप त्रास व्हायचा. शेतकऱ्यांने एकदा त्यांना धडा शिकवायचे ठरवले.**

एक दिवशी शेतकऱ्याने शेतात जाळे पसरून ठेवले. त्यावर थोडे धान्य टाकले. कावळ्यांनी धान्य पाहिले व ते धान्य खाण्यासाठी शेतात उतरले अन् जाळ्यात अडकले. सगळे कावळे जाण्यात अडकलेले पाहून शेतकरी खुश झाला. तो म्हणाला, "अरे चोरांनो, आता तुम्हाला चांगली शिक्षा मिळेल." एवढ्यात त्याला एक केविलवाणा आवाज ऐकू आला. त्याला आश्चर्य वाटले. त्याने काळजीपूर्वक पाहिले तर त्या जळ्यामध्ये कावळ्या बरोबर एक कबूतर अडकलेले त्याला दिसले.

शेतकरी कबुतराला म्हणाला, "तु कसा काय या टोळीत सामील झालास? पण आता काहीही झाले तरी मी तुला सोडणार नाही. तू वाईट संगत धरलीस त्याचा परिणाम तुला भोगावाच लागेल." असे म्हणून शेतकऱ्यांने आपल्या शिकारी कुत्र्यांना बोलावले. धावत आलेल्या कुत्र्यांनी एकामागून एक सगळ्या पक्षांना ठार मारले.

- तात्पर्य : वाईट संगतीत राहू नये.

देशाच्या सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील घडामोडींपेक्षा आज शिक्षण क्षेत्रातील वाढती अस्वस्थता अधिक चिंताजनक ठरत आहे. शिक्षण हे समाजाच्या भवितव्याचा पाया आहे.

# शिक्षण क्षेत्रातील अस्वस्थता चिंताजनक

त्यामुळे या क्षेत्रात राजकीय हस्तक्षेप, भेदभाव, अपुऱ्या सुविधा, प्रशासनाची उदासीनता किंवा विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष यांना स्थान असता कामा नये. मात्र, अलीकडच्या घटनांकडे पाहता परिस्थिती त्याच्या उलट दिशेने जात असल्याचे दिसते.

मुंबई आयआयटीतील विद्यार्थी साहिल वाकोडे यांच्या आत्महत्येचे प्रकरण याच संदर्भात गंभीर आहे. त्यांच्या मृत्यूमागील नेमके कारण तपासातून स्पष्ट होणे आवश्यक असताना, त्यांच्यावर शैक्षणिक कामात ChatGPTच्या वापरासंदर्भात आरोप झाल्याचे समोर आले. या प्रकरणात जातीय भेदभावाच्या आरोपांचीही चर्चा झाली आहे. विद्यार्थ्यांच्या आंदोलनानंतर संस्थेतील एका वरिष्ठ अधिकाऱ्यावर कारवाई आणि गुन्हा दाखल झाल्याचे वृत्त आहे. या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी होऊन सत्य समोर येणे अत्यावश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष झाल्यास गंभीर घटनांमागील कारणे दडपली जाण्याची भीती निर्माण होते.

वर्ध्यातील महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठातील विद्यार्थ्यांचे आंदोलनही शिक्षण क्षेत्रातील अस्वस्थतेचे आणखी एक उदाहरण आहे. पीएच.डी. प्रवेश प्रक्रियेबाबतचे प्रश्न, विभागांच्या पुनर्रचनेविरोधातील नाराजी आणि संशोधक विद्यार्थ्यांवरील कारवाई यामुळे विद्यार्थ्यांमध्ये असंतोष आहे. विद्यार्थ्यांनी प्रशासनाकडे मांडलेल्या प्रश्नांवर संवादातून तोडगा काढण्याऐवजी कारवाईचा मार्ग स्वीकारला जात असेल, तर त्यातून संघर्ष अधिक तीव्र होण्याची शक्यता असते.

ओडिशातील शालेय पाठ्यपुस्तकांतील कथित चुका आणि त्याविरोधातील विद्यार्थ्यांचे आंदोलनही शिक्षण व्यवस्थेतील गुणवत्तेचा प्रश्न अधोरेखित करते. शालेय पुस्तकांमधील चुका या केवळ मुद्रणाच्या त्रुटी मानून दुर्लक्षित करता येणार नाहीत. विद्यार्थ्यांना दिले जाणारे ज्ञान अचूक, वैज्ञानिक आणि दर्जेदार असणे ही सरकारची मूलभूत जबाबदारी आहे.

देशातील अनेक शाळा आणि महाविद्यालयांमध्ये शिक्षकांची कमतरता, अपुऱ्या वर्गखोल्या, प्रयोगशाळा, ग्रंथालये आणि इतर मूलभूत सुविधांचा अभाव अजूनही कायम आहे. शिक्षणासाठी निधीची मर्यादा असू शकते; मात्र विद्यार्थ्यांच्या भवितव्याच्या किंमतीवर ही मर्यादा



स्वीकारता येणार नाही.

विद्यार्थी हे केवळ आंदोलन करणारे घटक नाहीत, तर उद्याचे नागरिक आहेत. त्यांच्या प्रश्नांना गांभीर्याने ऐकणे, प्रशासनाशी संवाद साधणे आणि तक्रारींचे पारदर्शकपणे निराकरण करणे ही शिक्षण संस्थांची जबाबदारी आहे. आंदोलन झाले की ते संपेपर्यंत प्रतीक्षा करण्याऐवजी प्रश्न निर्माण होण्यापूर्वीच संवादाची यंत्रणा उभी करणे अधिक आवश्यक आहे.

शिक्षण क्षेत्रातील अस्वस्थता ही केवळ विद्यार्थ्यांची समस्या नाही; ती देशाच्या भवितव्याशी संबंधित आहे. वर्गखोलीतील सुविधा असोत, शिक्षकांची उपलब्धता असो, संशोधनाचे स्वातंत्र्य असो किंवा विद्यार्थ्यांचा सन्मान या प्रत्येक बाबीकडे गांभीर्याने पाहावे लागेल. शिक्षण व्यवस्थेतील अस्वस्थता वाढत राहणे म्हणजे भविष्यातील पिढीच्या विश्वासाला तडा जाणे. त्यामुळे आता दुर्लक्ष नव्हे, तर संवाद, सुधारणा आणि उत्तरदायित्वाची गरज आहे.

## ।। अभंगवाणी ।।



मृगजळा काय करावा उतार ।
पावावया पार पैल थडी ॥१॥

खापराचे होन खेळती लेंकुरें ।
कोण त्या वेव्हारें लाभ हाणि ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी बारामतीत येणार

## विद्या प्रतिष्ठानमध्ये ९ फुटी गौतम बुद्धांच्या पुतळ्याचे पंतप्रधानांच्या हस्ते अनावरण

**महाईन्यूज । बारामती**

**राज्याचे ज्येष्ठ नेते शरद पवार राज्यातील दुष्काळी दौऱ्यावर आहेत. आज दौऱ्याचा दुसरा दिवस असून बारामती आणि दौंड येथील शेतकऱ्यांना ते भेटणार आहेत. दरम्यान, आज त्यांनी पत्रकार परिषद घेऊन महत्त्वाची माहिती दिली. ३ नोव्हेंबर रोजी बारामती येथील विद्या प्रतिष्ठान येथे एका कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं असून खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी या कार्यक्रमाला येणार आहेत. हा कार्यक्रम आधी या महिन्यात नियोजित होता. परंतु, कार्यक्रमाची तारीख पुढे ढकलली असून मोदीही या कार्यक्रमाला येणार आहेत.**





शरद पवार अध्यक्ष असलेल्या विद्या प्रतिष्ठानमध्ये ९ फुटी आणि ४ टन वजनाचा गौतम बुद्धांचा पुतळा नक्षत्र गार्डनमध्ये उभारण्यात येणार आहे. या पुतळ्याचे अनावरण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमासाठीच ते बारामती येथे येणार असून याबाबत पंतप्रधान कार्यालयाने पत्रव्यवहार केला आहे.

दरम्यान, गौतम बुद्धांच्या पुतळ्याबरोबर महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज यांसह १३ महामानवांचे चित्रही येथे असणार आहेत. यावेळी राज्यपाल जिष्णु देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या प्रमुखांना कार्यक्रमांचं निमंत्रण देण्यात आलं आहे.

विद्या प्रतिष्ठान येथे गौतम बुद्ध यांचा पुतळा आहे, तिथे सर्वजण येतील. पेंटिंग पाहतील. कृत्रिम बुद्धिमत्ता याबाबत काम करणारे विद्यार्थ्यांना सगळेजण भेटतील. त्यांच्याशी बोलतील. मुलांनी स्टार्टअप केलं आहे, त्या मुलांना भेटतील. यानंतर सगळे नेते मैदानात येतील, तिथं ११.४५ मिनिटांनी कार्यक्रम सुरू होईल. संस्थेचे उपाध्यक्ष प्रभूणे बोलतील, त्यानंतर माझं बोलणं होईल, मुख्यमंत्री बोलतील, पंतप्रधान बोलतील. १२.१० मिनिटांनी पंतप्रधान त्यांच्या कार्यक्रमाला जातील", अशी माहिती देत शरद पवारांनी कार्यक्रमाची रुपरेषा दिली.

# सीजेपीचा १० ऑक्टोबरला दिल्लीतील जंतरमंतरवर आंदोलनाचा इशारा

**महाईन्यूज । मुंबई**

**मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आंदोलन तीव्र करण्याचा निर्णय 'कॉकरोच जनता पार्टी'ने (सीजेपी) घेतला आहे. येत्या १० ऑक्टोबरला नवी दिल्लीतील जंतरमंतर येथे मोठे आंदोलन करण्याची घोषणा पक्षाचे संस्थापक आणि संयोजक अभिजीत दिपके यांनी केली आहे. मुंबईतील शिवाजी पार्क येथे शुक्रवारी झालेल्या आंदोलनानंतर ही घोषणा करण्यात आली.**





मतदार याद्यांमधील अनियमिततेबाबत जबाबदारी निश्चित करण्याची मागणी करत शिवाजी पार्क येथे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाला मोठ्या संख्येने सर्व वयोगटातील आणि स्तरातील नागरिक उपस्थित होते, असा दावा आयोजकांनी केला. पोलिसांकडून निर्बंध असतानाही शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करण्यात आले.

मुख्य निवडणूक आयुक्ता ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा न दिल्यास देशभरातील आंदोलनकर्ते १० ऑक्टोबरला दिल्लीत दाखल होऊन जंतरमंतर येथे आंदोलन करतील, असा इशारा दिपके यांनी दिला. मुंबईनंतर गोवा, हैदराबाद, कोलकाता, पटणा, बेंगळूरु, रांची अशा देशाच्या विविध भागात सीजेपीचे आंदोलन होणार आहेत. पोलिसांनी आंदोलनकर्त्यांना अडविल्यास ज्या ठिकाणी अडविले जाईल, तेथेच आंदोलन केले जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

हे आंदोलन शांततामय पद्धतीने करण्यात येणार असून महात्मा गांधींच्या अहिंसक आंदोलनाच्या मार्गाने आंदोलन करण्याचा दावा आयोजकांनी केला आहे. लोकशाही संस्थांवरील नागरिकांचा विश्वास कायम ठेवण्यासाठी हे आंदोलन असल्याचे दिपके यांनी सांगितले.

दरम्यान, २० जुलै रोजी झालेल्या कारवाईचा संदर्भ देत पोलिसांकडून आंदोलन दडपण्याचा प्रयत्न झाल्यास त्याला विरोध केला जाईल, असा इशाराही आयोजकांनी दिला आहे. "ही लोकशाही वाचविण्याची लढाई असून, मुक्त आणि निष्पक्ष निवडणुकांवर विश्वास असलेल्या प्रत्येक नागरिकाने १० ऑक्टोबरच्या आंदोलनात सहभागी व्हावे," असे आवाहन दिपके यांनी केले.

# अमेरिकेत हिंदू मंदिरावर हल्ला!

## पूजा सुरू असतानाच खिडक्यांच्या काचा फोडल्या, 'हेट क्राइम'चा संशय

**महाईन्यूज । अमेरिका**

**अमेरिकेतील ओहायो राज्यातील ग्रेटर क्लीव्हलँड परिसरातील एका हिंदू मंदिरावर शुक्रवारी (दि. २ ऑक्टोबर) अज्ञात समाजकंटकांनी विटा फेकून हल्ला केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या दगडफेकीत मंदिराच्या खिडक्यांच्या काचा फुटून मोठे नुकसान झाले आहे. घटनेच्या वेळी मंदिरात पुजारी आणि भाविक उपस्थित होते, अशी माहिती 'कोएलिशन ऑफ हिंदूज ऑफ नॉर्थ अमेरिका' (कोहना) या संस्थेने दिली आहे.**



ओहायो राज्यातील रिचमंड हाइट्स येथील 'श्री स्वामीनारायण वडतलधाम हिंदू मंदिर' येथे शुक्रवारी दुपारी १.३० च्या सुमारास ही घटना घडली. 'हिंदू अमेरिकन फाउंडेशन'ने 'एक्स'वर दिलेल्या माहितीनुसार, एक किंवा त्याहून अधिक समाजकंटकांनी मंदिराच्या इमारतीवर विटा भिरकावल्या. सुदैवाने या घटनेत कोणी जखमी झाले आहे का, याबाबत अद्याप अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध असून स्थानिक पोलीस त्याचा तपास करत आहेत. तसेच एफबीआय आणि नागरी हक्क प्राधिकरणाशी संपर्क साधण्यात आला असून त्यांना या प्रकरणाची माहिती देण्यात आली आहे, असे 'एचएएफ'ने स्पष्ट केले. संस्था मंदिर प्रशासनाच्या सतत संपर्कात असून आवश्यक ती सर्व मदत पुरवली जात आहे.

संस्थेने या घटनेमागे द्वेषयुक्त गुन्ह्याचा (हेट क्राइम) संशय व्यक्त केला आहे. "सध्या अमेरिकेतील हिंदू समुदायाविरोधात द्वेष पसरवण्याचे प्रयत्न सुरू असतानाच हा संभाव्य 'हेट क्राइम'चा प्रकार घडला आहे," असे नमूद करत प्रशासनाने हल्लेखोरांना तातडीने अटक करावी, अशी मागणी 'एचएएफ'ने केली आहे. तसेच लोकप्रतिनिधी आणि सरकारी यंत्रणांनी या प्रकाराचा जाहीर निषेध करावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.

रिचमंड हाइट्सच्या महापौर किम थॉमस आणि स्थानिक प्रशासनाने घटनेचा निषेध करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी 'कोहना'ने केली आहे. दरम्यान, पोलिसांनी अद्याप कोणत्याही संशयिताची ओळख जाहीर केलेली नाही, तसेच या प्रकरणात कोणालाही अटक झालेली नाही. तसेच या हल्ल्यामागे धार्मिक हेतू असल्याचे ठोस पुरावे अद्याप समोर आलेले नाहीत.

### 'हिंदू हेरिटेज मंथ'दरम्यानच घटना

ओहायोमध्ये ऑक्टोबर महिना 'हिंदू हेरिटेज मंथ' म्हणून साजरा केला जातो. तसेच नवरात्रोत्सवाचीही तयारी सुरू असतानाच ही घटना घडल्याने स्थानिक हिंदू समुदायामध्ये तीव्र चिंता व्यक्त होत आहे. यापूर्वी ऑगस्ट २०२२ मध्ये न्यूयॉर्कमधील 'श्री तुलसी मंदिरा'बाहेरील महात्मा गांधींच्या पुतळ्याची विटंबना करण्यात आली होती, तर डिसेंबर २०२३ मध्ये कॅलिफोर्नियातील नेवार्क येथील 'एसएमव्हीएस श्री स्वामीनारायण मंदिरा'वर आक्षेपार्ह मजकूर रंगवण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर मंदिरांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

## हॉर्मुझच्या आखातात टँकरवर हल्ला, ५ भारतीयांची सुखरूप सुटका

**महाईन्यूज । इराण**

**हॉर्मुझच्या सामुद्रधुनीतून जात असलेल्या कुवेतचा ध्वज असलेल्या आणि कच्च्या तेलाची वाहतूक करणाऱ्या एका टँकरवर प्रोजेक्टाईलद्वारे हल्ला करण्यात आला. हल्ल्यानंतर टँकरवरील पाच भारतीय नागरिकांची सुखरूप सुटका करण्यात आली आहे. ओमानमधील भारतीय दूतावासाने या बचावकार्यात समन्वय साधला. या कार्यवाहीसाठी दूतावासाने ओमानी अधिकाऱ्यांचे आभार मानले आहेत.**



### पर्शियन आखातात ४,५०० हून अधिक भारतीय खलाशी

भारतीय परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी २९ सप्टेंबर रोजी सांगितले होते की, पर्शियन आखातातील विविध व्यापारी जहाजांवर साडेचार हजारांहून अधिक भारतीय खलाशी कार्यरत आहेत. याशिवाय भारताच्या हिताशी संबंधित १२ व्यापारी जहाजांवर सुमारे १६३ भारतीय खलाशी आहेत. त्यामध्ये भारताच्या ध्वजाखालील सहा आणि परदेशी ध्वजाखालील सहा अशा १२ जहाजांचा समावेश आहे. भारतीय नौकानयन मंत्रालयाकडून संबंधित राजनैतिक मोहिमा आणि स्थानिक यंत्रणा यांच्या समन्वयातून या जहाजांच्या हालचाली आणि भारतीय नागरिकांच्या सुरक्षेवर लक्ष ठेवले जात आहे.

भारतीय दूतावासाने दिलेल्या माहितीनुसार, 'एमटी काझिमाह ३' या कुवेतचा ध्वज असलेल्या टँकरवर हॉर्मुझच्या सामुद्रधुनीत प्रोजेक्टाईलद्वारे हल्ला करण्यात आल्याची गंभीर घटना घडली. या हल्ल्यानंतर तातडीने राबवण्यात आलेल्या मोहिमेत टँकरवरील सर्व पाच भारतीय नागरिकांची सुखरूप सुटका करून त्यांना सुरक्षितपणे किनाऱ्यावर हलवण्यात आले आहे.

"या घटनेनंतर भारतीय दूतावासाने टँकरवरील पाच भारतीय नागरिकांच्या बचावकार्यामध्ये समन्वय साधला. या पाचही जणांना किनाऱ्यावर सुखरूपपणे सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले आहे," अशी अधिकृत माहिती ओमानमधील भारतीय दूतावासाकडून देण्यात आली आहे.

कुवेतचा ध्वज असलेला हा टँकर कच्च्या तेलाची वाहतूक करत होता. हा टँकर टोगोमधील 'लोमे' बंदराच्या दिशेने जात असल्याची माहिती समोर आली आहे. प्रवासात असतानाच त्यावर प्रोजेक्टाईलद्वारे हल्ला करण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे.

बचावकार्यात सहकार्य केल्याबद्दल भारतीय दूतावासाने ओमानी प्रशासनाचे आभार मानले आहेत. हॉर्मुझच्या सामुद्रधुनीसह पर्शियन आखातातील व्यापारी जहाजांच्या सुरक्षेवर भारत बारकाईने लक्ष ठेवत आहे.

दरम्यान, 'यूके मेरीटाइम ट्रेड ऑपरेशन्स'नेही ओमानच्या किनाऱ्याजवळ एका कच्च्या तेलाची वाहतूक करणाऱ्या टँकरवर अज्ञात प्रोजेक्टाईलद्वारे हल्ला हल्ला करण्यात आल्याची स्वतंत्र माहिती दिली. या घटनेत सर्व कर्मचारी सुरक्षित असल्याचे सांगण्यात आले असून, अधिकाऱ्यांकडून तपास सुरू आहे.

व्यापारी जहाजे आणि खलाशांच्या सुरक्षेचा मुद्दा अलीकडेच संयुक्त राष्ट्रांच्या महासभेतही उपस्थित झाला होता. परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी आखात, लाल समुद्र आणि काळ्या समुद्रातील व्यापारी जहाजांवरील हल्ल्यांबाबत चिंता व्यक्त केली होती.

व्यापारी जहाजांच्या सुरक्षेसाठी भारत लायबेरियासह २३ देशांच्या आंतरराष्ट्रीय आघाडीत सहभागी झाला आहे, असेही जयशंकर यांनी स्पष्ट केले होते. व्यापारी जहाजे, ऊर्जापुरवठा आणि आंतरराष्ट्रीय व्यापार सुरळीत सुरू राहावा यासाठी आखातातील परिस्थिती नियंत्रणात आणावी, असे आवाहनही त्यांनी केले.

# ‘कजरा रे 2.0’मध्ये पुन्हा बच्चन कुटुंब?



बॉलिवूडमधील काही गाणी अशी आहेत, जी रिलीज झाल्यानंतर अनेक वर्षे उलटली तरी प्रेक्षकांच्या मनातून जात नाहीत. ‘कजरा रे’ हे त्यापैकीच एक गाणं आहे. ‘बंटी और बबली’ या चित्रपटातील या गाण्यात अभिषेक बच्चन, ऐश्वर्या राय बच्चन आणि अमिताभ बच्चन हे तिघेही एकत्र दिसले होते. त्यामुळे या गाण्याला प्रेक्षकांच्या मनात खास स्थान मिळालं आहे. आजही पार्टी किंवा सेलिब्रेशनमध्ये ‘कजरा रे’ वाजलं की वातावरणात उत्साह निर्माण होतो. ऐश्वर्या राय बच्चनचा डान्स, अभिषेक बच्चनची एनर्जी आणि अमिताभ बच्चनचा खास अंदाज यामुळे हे गाणं आजही लोकप्रिय आहे. आता या गाण्याच्या आठवणींना अभिषेक बच्चनने पुन्हा उजाळा दिला आहे. एका मुलाखतीत अभिषेक बच्चनने ‘कजरा रे’च्या शूटिंगशी संबंधित अनेक आठवणी सांगितल्या. त्याच्या म्हणण्यानुसार, त्याने आतापर्यंत केलेल्या गाण्यांच्या शूटिंगपैकी ‘कजरा रे’चं शूटिंग सर्वात जास्त मजेशीर होतं. अभिषेकने सांगितलं की, या गाण्याचं शूटिंग एखाद्या नेहमीच्या कोरिओग्राफ केलेल्या गाण्यासारखं झालं नव्हतं. सेटवर जणू एखादी मोठी डान्स पार्टीच सुरू होती. कलाकार आणि संपूर्ण टीमने या शूटिंगचा मनापासून आनंद घेतला. विशेष म्हणजे, याच शूटिंगदरम्यान अभिषेकचा वाढदिवसही आला होता. त्यामुळे सेटवर त्याचा वाढदिवस साजरा करण्यात आला.



## आय हेट माय फ्रेंड्स

अभिनेत्री शर्मिला शिंदेने झी मराठी वाहिनीचा २०२६ मधील पुरस्कार सोहळ्यासाठी खास लुक केला होता. यंदाच्या नॉमिनेशन सोहळ्याची पिकनिक थीम होती. याकरिता तिने आकाशी आणि लाल रंगाचे कपडे परिधान केले आहेत. या फोटोत तिच्या हातात एक बास्केट दिसत असून, तिचा हा लूक लक्ष वेधून घेत आहे. शर्मिलाने तिचा फोटो शेअर करत लिहिले, “या वर्षाची झी मराठी नॉमिनेशन पार्टीची थीम ‘Glam पिकनिक’ ही होती, म्हणून मी हँड बॅग म्हणून पिकनिक बास्केट घेऊन गेले तर माझ्या मित्र-मैत्रिणींनी त्यांचे फोन आणि पाऊच माझ्या बास्केटमध्ये ठेवायला दिले आणि माझ्या क्रिएटिव्हिटीचं मला ओझं केलं. आय हेट माय फ्रेंड्स (I hate my friends).” शर्मिलाच्या या पोस्टवर अनेक कलाकारांनी कमेंट्स करत हसण्याच्या इमोजी शेअर केल्या आहेत, तर तर काहींनी तिच्या लूकचे कौतुक केले आहे. सध्या शर्मिला शिंदे झी मराठीवरील ‘वीण दोघांतली ही तुटेना’ या मालिकेत ‘निकिता’ ही भूमिका साकारत आहे. याशिवाय ती ‘आमच्या पिढीची गोष्टच वेगळी’ या नाटकातही महत्त्वपूर्ण भूमिकेत प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे. शर्मिलाने ‘पुढचं पाऊल’, ‘नवरी मिळे हिटलरला’ यांसारख्या लोकप्रिय मालिकांमध्ये काम केलं आहे. शर्मिलाने खलनायिका किंवा सकारात्मक भूमिकेतून वेळोवेळी आपली वेगळी छाप निर्माण केली आहे. शर्मिला शिंदेच्या या हटके ‘Glam पिकनिक’ लूकची सोशल मीडियावर चांगलीच चर्चा रंगली आहे. पिकनिक बास्केटला हँडबॅग म्हणून वापरण्याची तिची कल्पना चाहत्यांना विशेष आवडली आहे. तिच्या या अनोख्या स्टाइलमुळे नॉमिनेशन पार्टीमध्ये तिचा लूक वेगळा ठरला. आकाशी आणि लाल रंगाच्या पोशाखात शर्मिला आकर्षक दिसत आहे. तिच्या लूकसोबत पिकनिक बास्केटनेही सर्वांचे लक्ष वेधून घेतले. शर्मिलाने मित्र-मैत्रिणींनी बास्केटमध्ये फोन आणि पाऊच ठेवल्याचा किस्सा मजेशीर पद्धतीने सांगितला आहे. तिच्या या पोस्टवर कलाकार आणि चाहत्यांनी विनोदी कमेंट्सचा वर्षाव केला आहे. काहींनी तिच्या फॅशन सेन्सचे आणि क्रिएटिव्हिटीचेही कौतुक केले आहे. अभिनयासोबतच शर्मिला आपल्या सोशल मीडिया पोस्टमधूनही चाहत्यांचे मनोरंजन करताना दिसते. त्यामुळे तिचा हा ‘Glam पिकनिक’ लूक सध्या चर्चेचा विषय ठरला आहे.



## ऑक्सिजन सपोर्टवर नुसरत भरुचा

अभिनेत्री तापसी पन्नू तिच्या स्पष्ट वक्तव्यामुळे नेहमीच चर्चेत असते. नुकतेच तिने एका चित्रपटातून तिला काढून टाकण्यात आले होते, त्याबाबतचा अनुभव सांगितला आहे. ‘एका चित्रपटातून मला एका अभिनेत्याच्या पत्नीला मी आवडत नसल्यामुळे सिनेमातून रिप्लेस करण्यात आलं होतं,’ असा दावा तापसीने केला. एका मुलाखतीत तापसी पन्नूने सांगितले की, “सिनेमाच्या लीड हिरोने मला रिप्लेस करण्यास सांगितलं असल्याचे मला सांगण्यात आलेलं होते. मी अनेकदा यामागच्या कारणांचा अंदाज लावण्याचा प्रयत्न केला. कदाचित त्यांना असुरक्षित वाटत असेल किंवा त्यांना त्यांच्या जवळच्या व्यक्तीला सिनेमात घ्यायचं असेल. कारणं अनेक असू शकतात. पण मला कधीही ठोस कारण सांगण्यात आलं नाही.” असे ती म्हणाली. जेव्हा तिने वारंवार सिनेमातून बाहेर काढण्याचं कारण विचारल्यानंतर तिला केवळ एवढंच उत्तर मिळालं की, “हिरोला तुम्ही या सिनेमाचा भाग असावं असं वाटत नाही. कारण हिरोच्या पत्नीला तुम्ही आवडत नाही, असं मला सांगण्यात आलं. आजपर्यंत मला समजलेलं नाही की त्यांना माझ्याशी नेमकी काय अडचण होती.” मात्र, तापसीने या मुलाखतीत संबंधित अभिनेत्याचं किंवा त्याच्या पत्नीचं नाव उघड केलेलं नाही. दरम्यान, तापसीने दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील तामिळ, तेलगू, मल्याळम भाषांतील अनेक चित्रपटांमध्ये काम केलं आहे.

# अमन सेहरावतची कुस्तीत सुवर्ण झेप

## आशियाई क्रीडा स्पर्धेत ५७ किलो वजनी गटात भारताला कुस्तीत गोल्ड मेडल

**महाईन्यूज । मुंबई**

**भारतीय कुस्तीपटू अमन सेहरावतने २०२६च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत पुरुषांच्या फ्रीस्टाइल ५७ किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावले. शनिवारी झालेल्या अंतिम सामन्यात अमनने उत्तर कोरियाच्या चोंग सोंग हान याचा पराभव केला. अंतिम सामन्याच्या सुरुवातीला अमनने बचावात्मक खेळ करत हानने डाव्या पायावर केलेले हल्ले यशस्वीपणे रोखले. सुरुवातीच्या काही मिनिटांत दोन्ही खेळाडूंना गुण मिळवता आले नाहीत.**



अमनला निष्क्रियतेचा इशारा मिळाल्यानंतर हानला एक गुण देण्यात आला.

यानंतर अमनने जोरदार पुनरागमन केले. त्याने लगेचच हानला खाली पाडत दोन गुण मिळवले. त्यानंतर अमनने आणखी एक शानदार टेकडाउन करत पहिल्या फेरीनंतर ४-१ अशी आघाडी घेतली.

दुसऱ्या फेरीच्या सुरुवातीलाच अमनने पुन्हा एकदा टेकडाउन करत आपली आघाडी ६-१ अशी वाढवली. मात्र, हानने हार मानली नाही. गुडघ्याला दुखापत झाल्यासारखे दिसत असतानाही त्याने दमदार पुनरागमन केले. त्याने टेकडाउन आणि रोलच्या माध्यमातून झटपट सहा गुण मिळवत अमनची ६-१ अशी आघाडी उलटवून ७-६ अशी आघाडी घेतली. सामना हातातून निसटण्याची शक्यता निर्माण झाल्यानंतर अमनने जबरदस्त खेळी केली. त्याने टेकडाउनसाठी दोन आणि रोलसाठी आणखी दोन असे चार गुण मिळवत १०-७ अशी आघाडी पुन्हा मिळवली. त्यानंतर हानने माघार घेतल्याने अमनला आणखी एक गुण मिळाला.

शेवटच्या क्षणी अमनने आपली आघाडी कायम ठेवत सामना जिंकला आणि आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदकावर नाव कोरले. या विजयासह अमन सेहरावत हा या आशियाई क्रीडा स्पर्धेत कुस्तीमध्ये भारताला सुवर्णपदक मिळवून देणारा दुसरा खेळाडू ठरला. यापूर्वी शुक्रवारी सुजीत कालकलने सुवर्णपदक पटकावले होते.

अमनने संपूर्ण सामन्यात सुरुवातीला मजबूत बचाव केला. त्यानंतर योग्य वेळी आक्रमक खेळ करत आघाडी मिळवली. दुसऱ्या फेरीत सहा गुण गमावल्यानंतरही त्याने संयम न गमावता निर्णायक डाव खेळला आणि भारतासाठी आणखी एक सुवर्णपदक निश्चित केले.

आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताची पदकांची कामगिरीही मजबूत राहिली आहे. कुमकुम मोहोड, प्रणवी उर्स आणि भारतीय पुरुष क्रिकेट संघानेही सुवर्णपदक पटकावले आहे. महिला सांघिक गोल्फमध्ये प्रणवी उर्स, अदिती अशोक आणि दीक्षा डागर यांनी रौप्यपदक मिळवले. पुरुषांच्या वैयक्तिक रिकर्व्ह तिरंदाजीत नीरज चौहानने कांस्यपदक जिंकले. कुस्तीमध्ये अमन सेहरावतने ५७ किलो गटात सुवर्णपदक मिळवले.

### आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताचे वर्चस्व

पुरुषांची अंतिम सामन्यात एका टप्प्यावर गुणसंख्या २०-२० अशी बरोबरीत होती; परंतु भारताने आघाडी घेत आणखी एक सुवर्णपदक जिंकले. अपवाद २०१८ च्या जकार्ता येथे झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेपूर्वी भारतीय पुरुष संघाने सलग सात सुवर्णपदके जिंकली होती. मात्र जकार्ता येथे झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत इराण संघाने सुवर्णपदक पटकावले होते. तर भारत चौथ्या स्थानावर राहिला होता. २०२३ च्या हांगझोऊ स्पर्धेत भारताने कबड्डी संघाने पुनरागमन करत पुन्हा एकदा आशियाई स्पर्धेत विजेतेपद पटकावले. आता जपानमधील आशियाई क्रीडा स्पर्धेत अजिंक्यपदा कायम ठेवले.

## आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताचा दणदणीत विजय! फायनलमध्ये पाकिस्तानचा पराभव

**महाईन्यूज । मुंबई**

**आशियाई क्रीडा स्पर्धेत क्रिकेटच्या अंतिम सामन्यात भारताने पाकिस्तानचा ११ धावांनी पराभव केला. या विजयासह भारतीय संघाने सुवर्णपदकावर पुन्हा आपले नाव कोरले. पाकिस्तानला रौप्यपदक, तर श्रीलंकेला कांस्यपदक मिळाले. भारताने प्रथम फलंदाजी करत २११ धावा केल्या, तर पाकिस्तानला २० षटकांत १९२ धावांपर्यंतच मजल मारता आली.**



निशिनच्या कोरोगी स्पोर्ट्स पार्कमध्ये झालेल्या या सामन्यात भारतीय संघाने प्रथम फलंदाजी करत २० षटकांत ६ बाद २११ धावा केल्या. पाकिस्तानसमोर विजयासाठी २१२ धावांचे लक्ष्य होते. मात्र पाकिस्तानचा संघ २० षटकांत ६ बाद १९२ धावांपर्यंतच मजल मारू शकला.

भारताचा कर्णधार श्रेयस अय्यरने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मात्र भारताची सुरुवात फारशी चांगली झाली नाही. वैभव सूर्यवंशी आणि संजू सॅमसन हे दोघेही लवकर बाद झाले. वैभवने ९ चेंडूंत १५ धावा केल्या, तर सॅमसनला केवळ २ धावा करता आल्या.

यानंतर अभिषेक शर्मा आणि श्रेयस अय्यर यांनी डाव सावरला. दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी ४२ धावांची भागीदारी केली. अभिषेकने आक्रमक फलंदाजी करत पाकिस्तानच्या गोलंदाजांवर दबाव निर्माण केला.

२१२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी पाकिस्तानचा संघ मैदानात उतरला. सुरुवातीपासूनच भारतीय गोलंदाजांनी पाकिस्तानच्या फलंदाजांवर दबाव ठेवला. पाकिस्तानने काही आक्रमक फटके खेळले, मात्र भारतीय संघाने नियमित अंतराने विकेट घेतल्या.

वाशिंग्टन सुंदरने महत्त्वाची विकेट घेत अब्दुल समदला बाद केले. त्यानंतर १६२ धावांवर पाकिस्तानच्या पाच विकेट गेल्या. त्यामुळे पाकिस्तानच्या विजयाच्या आशा कमी होत गेल्या.

अखेर पाकिस्तानचा संघ २० षटकांत ६ बाद १९२ धावाच करू शकला. भारताने ११ धावांनी सामना जिंकत सुवर्णपदक आपल्या नावावर केले. या विजयामुळे भारतीय पुरुष क्रिकेट संघाने आशियाई गेम्समधील आपले सुवर्णपदक कायम राखले. अंतिम सामन्यात पाकिस्तानचा पराभव करत भारताने आणखी एका मोठ्या सामन्यात विजय मिळवला.

### अभिषेक शर्माची तुफानी खेळी

अभिषेक शर्माने अवघ्या २८ चेंडूंत ६१ धावांची शानदार खेळी केली. त्याच्या या खेळीत ७ षटकार आणि ३ चौकारांचा समावेश होता. त्याच्या आक्रमक फलंदाजीमुळे भारताच्या धावसंख्येला वेग मिळाला. अभिषेक बाद झाल्यानंतर तिलक वर्माने डावाची जबाबदारी घेतली. त्याने अवघ्या २२ चेंडूंत नाबाद ५१ धावा केल्या. तिलकच्या फटकेबाजीमुळे भारताला २०० धावांचा टप्पा पार करता आला. शिवम दुबेनेही अखेरच्या षटकांमध्ये महत्त्वाची खेळी केली. त्याने १५ चेंडूंत २७ धावा करत भारताची धावसंख्या २११ धावांपर्यंत नेण्यात मोलाची भूमिका बजावली.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

epaper.mahaenews.com

ePaper

। रविवार ।

दि. 04 ऑक्टोबर 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



# ‘एज्युस्किल्स कनेक्ट समिट २०२६’ मध्ये माईर्स एमआयटीचा गौरव

## ७ संस्थात्मक व ३ वैयक्तिक पुरस्कारांनी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाचा सन्मान

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**माईर्स एमआयटी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय, आळंदी (दे.), पुणे यांनी जयपूर(राजस्थान) येथे २५ व २६ सप्टेंबर २०२६ रोजी झालेल्या एज्युस्किल्स कनेक्ट समिट २०२६ मध्ये संस्थात्मक स्तरावरील ७ पुरस्कार आणि ३ वैयक्तिक पुरस्कार पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले आहे.**




संचालकांना ‘डायरेक्टर एक्सलन्स अवॉर्ड’महाविद्यालयाचे संचालक डॉ. बी. बी. वाफारे यांना त्यांच्या कुशल नेतृत्वासाठी व शैक्षणिक योगदानासाठी डायरेक्टर एक्सलन्स अवॉर्ड २०२६’ देऊन सन्मानित करण्यात आले. उपसंचालिकांना ‘वुमेन लीडरशिप अवॉर्ड’उपसंचालक (शैक्षणिक व संशोधन) डॉ. अक्षदा कुलकर्णी यांना ‘वुमेन लीडरशिप अवॉर्ड २०२६’ तसेच ‘बेस्ट परफॉर्मिंग सीओई (COE) कोऑर्डिनेटर २०२६’ हे दोन पुरस्कार प्रदान करण्यात आले.

हे यश मा. डॉ. सुनील कराड सर यांच्या द्रष्टे नेतृत्वाचे, संचालक डॉ. बी. बी. वाफारे यांच्या मार्गदर्शनाचे व पाठबळाचे तसेच सर्व घटकांच्या सांघिक प्रयत्नांचे फलित असल्याची भावना संस्थेने व्यक्त केली. सर्व पुरस्कारप्राप्त मान्यवर, विद्यार्थी व समन्वयकांचे महाविद्यालयाच्या वतीने हार्दिक अभिनंदन करण्यात येत आहे.

MIT | Academy Engineeri
(An Autonomous Institute affiliated to Savitribai Phule Pune Uni

### विद्यार्थी व विभागीय समन्वयकांचे कौतुक

या यशामागे गेल्या दोन वर्षांत एज्युस्किल्सच्या माध्यमातून इंटर्नशिप यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांचे परिश्रम हा सर्वात महत्त्वाचा घटक असल्याचे संस्थेने नमूद केले. तसेच सर्व विभागांचे एज्युस्किल्स समन्वयक, सर्व अधिष्ठाता (DEANS) व विभागप्रमुख यांनी घेतलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचेही विशेष कौतुक करण्यात आले.

### पुरस्कार

- बेस्ट परफॉर्मिंग इन्स्टिट्यूट – २०२६
- बेस्ट परफॉर्मिंग कॉलेज २०२६ – एज्युस्किल्स
- फ्यूचर-रेडी इन्स्टिट्यूशन अवॉर्ड
- रीजनल लँग्वेज एक्सलन्स अवॉर्ड – मराठी
- आउटस्टँडिंग कॉन्ट्रिब्युशन इन मिलियन व्हर्च्युअल इंटर्नशिप
- AIR-2: कॉलेज इन AICTE-एज्युस्किल्स व्हर्च्युअल इंटर्नशिप अवॉर्ड
- असेस2मी (Assess2me) मोस्ट एंगेज्ड इन्स्टिट्यूट अवॉर्ड्स २०२६

# प्रियदर्शनी स्कूल, मोशी येथे गांधी जयंतीनिमित्त स्वच्छता अभियान

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**प्रियदर्शनी स्कूल, मोशी येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त विविध प्रेरणादायी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पहार अर्पण आणि अभिवादनाने झाली. याप्रसंगी विद्यार्थी व शिक्षकांनी गांधीजींच्या सत्य, अहिंसा, साधेपणा आणि स्वच्छतेच्या विचारांचे स्मरण केले.**




जयंतीनिमित्त शाळेत विशेष स्वच्छता अभियान राबविण्यात आले, ज्यामध्ये विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या अभियानाची सुरुवात विद्यार्थ्यांनी आपल्या स्वतःच्या दप्तराच्या स्वच्छतेपासून केली. त्यानंतर वर्गखोल्या, शाळेचा परिसर आणि आजूबाजूचा परिसर विद्यार्थ्यांनी श्रमदानातून चकाचक केला. कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे, ओला व सुका कचरा वेगळा करणे आणि प्लास्टिकचा वापर टाळणे याविषयी विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन करण्यात आले. स्वच्छतेसोबतच विद्यार्थ्यांमध्ये दया, करुणा आणि प्राणी-पक्ष्यांप्रती संवेदनशीलता रुजावी, यासाठी पक्ष्यांना दाणे व पाणी देण्याचा उपक्रमही राबवण्यात आला. या माध्यमातून सजीवांप्रती प्रेम आणि माणुसकी जपण्याचा संदेश देण्यात आला. “स्वच्छता ही केवळ एका दिवसापुरती मर्यादित न राहता ती प्रत्येकाच्या दैनंदिन जीवनशैलीचा भाग बनली पाहिजे,” असा संदेश शिक्षकांनी दिला. विद्यार्थ्यांनी “स्वच्छता हीच सेवा” या भावनेतून स्वतःचे घर, शाळा आणि परिसर कायम स्वच्छ ठेवण्याचा आणि समाजात स्वच्छतेचा प्रसार करण्याचा संकल्प केला. गांधीजींच्या विचारांना प्रत्यक्ष कृतीतून आदरांजली वाहत हा उपक्रम उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडला.

# कचरा प्रक्रिया केंद्रांवरून नगरसेवकांमध्येच मतभेद

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

पिंपरी-चिंचवड शहरात दहा ठिकाणी कचरा प्रक्रिया केंद्रांच्या ठिकाणची घोषणा आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केली आहे. मात्र, आमच्या प्रभागात कचरा केंद्र नको, असा दबाव स्थानिक नगरसेवकांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे घनकचरा समस्या सोडवण्यासाठी प्रयत्नांना खो बसत असून, विरोधामुळे प्रशासन हतबल झाले आहे.

महापालिकेच्या मोशी कचरा डेपोतील वेस्ट टू एनर्जी प्रकल्पाती अनधिकृत प्रशासकीय इमारत कोसळल्यानंतर झालेल्या दुर्घटनेत 9 कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला. तर, काही कर्मचारी जखमी झाले आहेत. ती घटना 8 जुलैला घडली. त्यानंतर संपूर्ण शहरात कचरा कोंडीची समस्या निर्माण झाली. कचरा कोठे डम्प करायचा, हा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. तात्पुरता पर्याय म्हणून सध्या मोशी डेपोतच कचरा डम्प केला जात आहे.

शहरातील दहा क्षेत्रीय कार्यालयात एक असे एकूण दहा ठिकाणी कचरा प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. जागांचा शोध घेऊन महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी त्या जागांची यादी 13 सप्टेंबरला जाहीर केली. त्यानंतर नगरसेवकांसह त्या प्रभागातील विविध संघटना, माजी नगरसेवक, पदाधिकारी व नागरिकांकडून तेथे कचरा प्रक्रिया केंद्र सुरू करण्यास विरोध करण्यात येत आहेत. त्याबाबत आयुक्तांना आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांना भेटून दबाव टाकला जात आहे. कोणत्याही परिस्थितीत कचरा केंद्र आमच्या प्रभागात करू नका, असा आग्रह धरला जात आहे. या विरोधामुळे प्रशासन हतबल झाले आहे. नगरसेवकच विरोध करत असतील तर, कचरा प्रक्रिया केंद्र सुरू कोठे करायचे, शहराचा कचरा प्रश्न कसा सोडवायचा, असा प्रश्न प्रशासनासमोर उभा झाला आहे.

# प्रतिभा ज्युनिअर कॉलेजमध्ये महात्मा गांधी जयंती उत्साहात

## सत्य, अहिंसा, शांतता, साधेपणा आणि स्वच्छता या महात्मा गांधी यांच्या विचारांचे स्मरण

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**चिंचवड येथील कमला एज्युकेशन सोसायटी संचलित प्रतिभा ज्युनिअर कॉलेज मध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. सत्य, अहिंसा, शांतता, साधेपणा आणि स्वच्छता या महात्मा गांधी यांच्या विचारांचे स्मरण करून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, शिस्त आणि स्वच्छतेविषयी जनजागृती करण्यात आली.**



महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस प्राचार्या डॉ . वनिता कुऱ्हाडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून त्यांच्या समवेत प्राध्यापक व विद्यार्थांनी अभिवादन करून स्वच्छता, शिस्त, शांतता आणि सामाजिक जबाबदारी या मूल्यांचे पालन करण्याचा सामुहिक संकल्प केला. "तुम्हाला जगात जो बदल पहावयाचा आहे, तो बदल स्वतःपासून सुरू करा" असा कानमंत्र देत , महात्मा गांधी यांच्या विचारातून विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्यात आली.

या उपक्रमाचे आयोजन सोशल वेल्फेअर कमिटीचे डॉ. रघुनाथ ताम्हाणे तसेच इको क्लबच्या प्रा. सुनीता गायकवाड, प्रा. मच्छिंद्र सोनवणे आणि प्रा. गोविंद गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

महाविद्यालयाच्या समन्वयक डॉ. सुनीता पटनाईक, प्रा. जस्मिन फरास आणि प्रा. वैशाली देशपांडे यांच्या मार्गदर्शनामुळे कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.

विद्यार्थ्यांनी महात्मा गांधींच्या विचारांचा अंगीकार करून स्वच्छ, शिस्तबद्ध आणि जबाबदार समाजनिर्मितीत योगदान द्यावे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. कार्यक्रमासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वनिता कुऱ्हाडे यांनी मार्गदर्शन केले.




# गायत्री इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती उत्साहात

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

**गायत्री इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त विशेष स्वच्छता मोहीम व प्रबोधन कार्यक्रमाचे उत्साहात आयोजन करण्यात आले होते.**




कार्यक्रमाचा प्रारंभ संस्थेचे संस्थापक विनायकरावजी भोंगाळे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या नगरसेविका कविता भोंगाळे यांच्या हस्ते महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व विनम्र अभिवादन करून झाला.

याप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना नगरसेविका कविता भोंगाळे म्हणाल्या, "महात्मा गांधीजींनी स्वच्छतेला केवळ सवय मानले नाही, तर तो आपल्या जीवनशैलीचा मुख्य भाग बनवला. आजच्या युवा पिढीने गांधीजींच्या विचार आणि तत्त्वांचे अनुसरण करून आपला परिसर स्वच्छ ठेवण्याचा संकल्प केला पाहिजे."

प्रतिमा पूजनानंतर शाळेमध्ये भव्य स्वच्छता मोहिमेस सुरुवात झाली. यामध्ये विद्यार्थी, शिक्षक व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

विद्यार्थ्यांनी वर्गखोल्या, क्रीडांगण आणि शाळेच्या सभोवतालचा परिसर झाडून कचरा गोळा करत परिसर चकाचक केला.

प्लास्टिकमुक्त परिसराचा संदेश देत ओला व सुका कचरा वेगळा करून त्याची योग्य विल्हेवाट लावण्यात आली.

विद्यार्थ्यांनी "स्वच्छ भारत, सुंदर भारत" आणि "स्वच्छता हीच सेवा" अशा विविध घोषणा देऊन स्वच्छतेचा संदेश दिला.

कार्यक्रमाच्या शेवटी शाळेच्या मुख्याध्यापकांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे, नगरसेविका कविता भोंगाळे यांचे तसेच शिक्षक व विद्यार्थ्यांचे आभार मानले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये श्रमदानाचे महत्त्व आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव दृढ होण्यास मदत झाली.

# थेरगाव येथे महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंती

## न्यू इंग्लिश मीडियम स्कूल थेरगाव येथे दैनंदिन जीवनात स्वच्छता आणि संस्कार' यावर भर

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**न्यू इंग्लिश मीडियम स्कूल, थेरगाव येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भारताचे माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांची जयंती अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विजय पवार आणि मुख्याध्यापिका विद्या नाईक यांच्या हस्ते महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला.**



यावेळी विद्यार्थ्यांना संबोधित करताना संस्थापक अध्यक्ष विजय पवार यांनी महात्मा गांधी यांच्या सत्य, अहिंसा आणि स्वच्छतेच्या विचारांचे महत्त्व विशद केले. आजच्या आधुनिक युगात विद्यार्थ्यांनी गांधीजींचे विचार आणि उत्तम संस्कार अंगीकारणे काळाची गरज असल्याचे सांगत त्यांनी दैनंदिन जीवनात स्वच्छतेला प्राधान्य देण्याचे आवाहन केले.

मुख्याध्यापिका विद्या नाईक यांनी लाल बहादूर शास्त्री यांच्या "जय जवान, जय किसान" या घोषणेची आठवण करून देत त्यांच्या साध्या राहणीमानाचा व उच्च विचारांचा आदर्श विद्यार्थ्यांसमोर ठेवला. "परिसर स्वच्छ ठेवणे हीच गांधीजींना खरी आदरांजली ठरेल; त्यामुळे विद्यार्थ्यांनी घरासोबतच शाळा आणि परिसर स्वच्छ ठेवण्याचा संकल्प करावा," असे प्रतिपादन त्यांनी केले.

या कार्यक्रमाला शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता उत्साही वातावरणात झाली. संस्थापक अध्यक्ष विजय पवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना महात्मा गांधी यांच्या सत्य, अहिंसा आणि स्वच्छतेच्या विचारांचे महत्त्व विशद केले. आधुनिक युगात विद्यार्थ्यांनी गांधीजींचे विचार आणि उत्तम संस्कार अंगीकारून दैनंदिन जीवनात स्वच्छतेला प्राधान्य द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. मुख्याध्यापिका विद्या नाईक यांनी लाल बहादूर शास्त्री यांच्या "जय जवान, जय किसान" या घोषणेची आठवण करून देत त्यांच्या साध्या राहणीमानाचा व उच्च विचारांचा आदर्श विद्यार्थ्यांसमोर ठेवला.

> "महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांचे विचार हे केवळ इतिहासातील पाने नसून ते आजच्या पिढीसाठी जगण्याचा मार्ग आहेत. आजच्या डिजिटल युगात मुलांवर उत्तम संस्कार होणे आणि त्यांच्यात स्वच्छतेची आवड निर्माण होणे अत्यंत गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञान न घेता गांधीजींचे सत्य, अहिंसा आणि स्वच्छतेचे विचार आपल्या दैनंदिन जीवनात आचरणात आणावेत, हाच या कार्यक्रमामागील आमचा मुख्य उद्देश आहे.
>
> - **विजय पवार, संस्थापक अध्यक्ष, न्यू इंग्लिश मीडियम स्कूल, थेरगाव.**

# एस. बी. पाटील पब्लिक स्कूलच्या सक्षम जाधवची तलवारबाजी स्पर्धेत चमकदार कामगिरी

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि पुणे जिल्हा परिषद क्रीडा विभागाच्या वतीने आयोजित शालेय तलवारबाजी (Fencing) स्पर्धेत रावेत येथील एस. बी. पाटील पब्लिक स्कूलच्या सक्षम जाधव याने १४ वर्षांखालील वयोगटात उल्लेखनीय कामगिरी करत सर्व फेऱ्यांमध्ये विजय संपादन केला.**







इयत्ता सहावीमध्ये शिकणाऱ्या सक्षमने एकूण ६ फेऱ्यांमध्ये प्रत्येकी ५ गुणांचे लक्ष्य पूर्ण करत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले आणि सर्व फेऱ्यांमध्ये विजय मिळवला. सक्षमला शाळेच्या क्रीडा शिक्षिका प्रिया सूर्यवंशी यांचे मार्गदर्शन लाभले आहे. तसेच तो इयत्ता तिसरीपासून बालेवाडी येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुलात 'शिवछत्रपती पुरस्कार' विजेत्या श्वेता चंडालिया यांच्या मार्गदर्शनाखाली तलवारबाजीचा सराव करत आहे.

कासारवाडी प्राथमिक शाळेत पार पडलेल्या या स्पर्धेत २४ शाळांनी सहभाग घेतला होता. विविध गट आणि क्रीडा प्रकारांमध्ये सुमारे ५६ वैयक्तिक खेळाडू आणि १८ संघांनी सहभाग नोंदविला होता.

"पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (PCET) एस. बी. पाटील पब्लिक स्कूलमध्ये नियमित शालेय अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांना विविध क्रीडा प्रकारांत नैपुण्य मिळवण्यासाठी दर्जेदार सुविधा आणि प्रोत्साहन दिले जाते; त्यामुळेच सक्षमला हे यश संपादन करता आले," असे शाळेच्या प्राचार्या डॉ. बिंदू सैनी यांनी सांगितले.

या यशाबद्दल पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर तसेच कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी सक्षम जाधव, क्रीडा शिक्षिका प्रिया सूर्यवंशी आणि मुख्याध्यापिका पद्मावती बंडा यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.